# DeccanIAS™

UPSC/MPSC

संच क्र. **D**

# 2020

G11

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

वेळ : 1 (एक) तास

## प्रश्नपुस्तिका

## सामान्य क्षमता चाचणी – 4

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

### सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे**. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील."**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

### ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अश्या व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Email : executivedeccanias@gmail.com **Mob : 9421535607 /7517685197**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS

1) पुढीलपैकी कोणत्या कृतीचा/कृतींचा समावेश अनुच्छेद 19 मध्ये तरतूद असलेल्या स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये होऊ शकत नाही?

अ) मौनाचे स्वातंत्र्य (Freedom of Silence)

ब) संप करण्याचा हक्क (Right to Strike)

क) शांतपणे निदर्शन करणे (Demonstration)

ड) युनियन किंवा सहकारी संस्था स्थापन करणे.

1) अ, ब 2) फक्त ब 3) फक्त अ 4) ब, क, ड

---

2) पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने ओळखा.

अ) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ठरवण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो त्यानुसार सन 2019 मध्ये सर्वोच्च न्यायालयातील (सरन्यायाधीशांसहित) न्यायाधीशांची संख्या 34 करण्यात आली आहे.

ब) तृतीय न्यायाधीश खटल्यात (1998) सर्वोच्च न्यायालयाने सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक करण्याकरिता राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयातील चार सेवाज्येष्ठ न्यायाधीशांचा सल्ला घेणे बंधनकारक असल्याचा निर्णय दिला.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---

3) पुढे दिलेल्या विधानांपैकी सत्य विधाने ओळखा.

अ) अनुच्छेद 360 अंतर्गत तरतुद असलेली ‘वित्तीय आणीबाणी’ राष्ट्रपतींद्वारे लागू झाल्यानंतर ती रद्द करण्याकरिता (Revoke) संसदेची परवानगी घेण्याची आवश्यकता नसते.

ब) ‘राष्ट्रीय आणीबाणी’ लागू असताना राष्ट्रपती त्यांच्या मर्जीनुसार लोकसभेचा कार्यकाल एका वर्षाने वाढवू शकतात.

क) लोकसभा चालू असलेली ‘राष्ट्रीय आणीबाणी’ साध्या बहुमताने ठराव पारित करून रद्द करू शकते.

1) अ, क 2) अ, ब 3) ब, क 4) अ, ब, क

---

4) दिलीपसिंग भुरिया समिती कशाशी संबंधित होती?

1) केंद्र-राज्य संबंध

2) महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीच्या वित्तीय स्थितीचे निरीक्षण करण्याशी

3) आदिवासीचे स्वयंशासन

4) राष्ट्रपती राजवटीच्या निकषांचा अभ्यास

---

5) अनुच्छेद 3 अंतर्गत घटक राज्याच्या संरचनेतील बदलासंबंधित विधेयकाबाबत संबंधित घटक राज्याचे मत पुढीलपैकी कोणाकरिता बंधनकारक असते?

1) संसद 2) राष्ट्रपती 3) केंद्र शासन 4) यापैकी नाही

---

6) काही संघशासित प्रदेशांकरिता (Union Teritories) नियमन (Regulation) करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार कितव्या अनुच्छेदात समाविष्ट आहे?

1) अनुच्छेद 240 2) अनुच्छेद 239A 3) अनुच्छेद 239AA 4) अनुच्छेद 239AB

---

7) राज्यपालांनी राष्ट्रपतींकरिता राखून ठेवलेले विधेयक राष्ट्रपतींनी राज्य विधिमंडळाकडे पुनर्विचारार्थ पाठवल्यास विधिमंडळाने त्याचा पुनर्विचार (Reconsider) जास्तीत जास्त किती कालावधीत करणे गरजेचे असते?

1) 3 महिने 2) 6 महिने 3) 60 दिवस 4) यापैकी नाही

---

8) राज्य निवडणूक आयुक्तांची (State Election Commissioner) बडतर्फी करण्याचा अधिकार कोणाला असतो?

1) राज्यपाल 2) राज्य शासन 3) उच्च न्यायालय 4) यापैकी नाही

---

9) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांचे 'परमादेश अधिकार क्षेत्र' (Writ Jurisdiction) हे संविधानाच्या 'मूलभूत संरचनेचा' भाग आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यात दिला आहे?

1) एस्.आर.बोम्मई खटला (1994) 2) आय.आर.कोहेलो खटला (2007)

3) कुमार पद्म प्रसाद खटला (1992) 4) चंद्र कुमार खटला (1997)

---

10) तात्पुरत्या कालावधीकरिता शिक्षा स्थगित करण्याकरिता राष्ट्रपती 'क्षमादानाच्या' कोणत्या पध्दतीचा वापर करतात?

1) रिप्राईव्ह 2) रेस्पाईट 3) कम्युटेशन 4) रेमिशन

---

11) जेव्हा लोकसभेच्या सभापतींच्या बडतर्फीचा ठराव सभागृहात विचाराधीन असतो तेव्हा...

अ) सभापती सभागृहात उपस्थित राहतात आणि मतदानात भाग घेऊ शकतात.

ब) सभापती सभागृहाच्या अध्यक्षपदी (PO) नसतात.

क) सभापती मतदान करू शकत नाहीत.

1) फक्त अ योग्य 2) अ, ब योग्य 3) ब, क योग्य 4) फक्त ब योग्य

---

12) पुढीलपैकी कोणता प्रस्ताव सभागृहात मांडण्यासाठी कारण देण्याची गरज नसते?

अ) निंदाव्यंजक प्रस्ताव ब) अविश्वास प्रस्ताव

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---



DeccanIAS

13) महाराष्ट्रातील ग्रामसभांविषयीची अयोग्य विधाने ओळखा.

अ) प्रत्येक वित्तीय वर्षात ग्रामसभेच्या किमार चार सभा घेणे बंधनकारक आहे.

ब) ग्रामसभेत गावातील किमान वय 21 असलेल्या सर्व स्त्री-पुरूष मतदारांचा समावेश होतो.

क) वित्तीय वर्ष सुरू झाल्यानंतर 3 महिन्यांच्या आत ग्रामसभेची पहिली सभा घेतली पाहिजे.

1) फक्त क 2) फक्त अ 3) ब, क 4) अ, ब, क

---

14) पुढे दिलेल्या घटना कालानुक्रमे जुळवा.

अ) 'झाशी' संस्थानाचे खालसाकरण

ब) रानडे यांना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्तीपद मिळाले.

क) सत्यशोधक समाजाची पुणे येथे स्थापना

ड) पहिले इंग्रज-शीख युद्ध

1) अ-ड-क-ब 2) क-अ-ब-ड 3) ड-अ-ब-क 4) ड-ब-अ-क

---

15) सन 1857 चा उठाव हा 'हिंदू-मुस्लिमांनी ब्रिटीश सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी आपसांत केलेला कट होता' असे मत कुणी व्यक्त केले आहे?

1) जेम्स ऑट्रम 2) गो.स.सरदेसाई 3) स्टॅन्ले वॉलपोर्ट 4) सर जॉन लॉरेन्स

---

16) चुकीची जोडी ओळखा.

1) रोमेशचंद्र दत्त - 'इंडिया इन व्हिक्टोरियन एज' या ग्रंथाचे लेखन

2) चिंतामणी सी.वाई - 'इंडियन पीपल्स' या पत्राचे संपादक

3) के.टी.तेलंग - 'हिंदू युनियन क्लबची' स्थापना केली

4) न्या.नारायण गणेश चंदावरकर - इ.स. 1901 च्या लाहोर येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष होते.

---

17) माँटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणांबाबत खालीलपैकी कोणत्या नेत्यांनी प्रखर विरोध न करता तो स्वीकारण्याबाबत अनुकूलता दर्शविली होती?

अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी ब) श्रीनिवास शास्त्री

क) दिनशा वाच्छा ड) विठ्ठलभाई पटेल

1) फक्त अ 2) अ, क 3) ब, क, ड 4) अ, ब, क, ड

---

18) योग्य जोड्या जुळवा.

अ) एस.एन.चौधरी — 1) दलित भारत
ब) काकासाहेब बर्वे — 2) 'आत्मोद्धार'
क) धनाजी बिऱ्हाडे — 3) भारत
ड) चित्तरंजन दास — 4) फॉरवर्ड

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 2 | 1 | 4 |
| 2) | 2 | 4 | 1 | 3 |
| 3) | 2 | 3 | 4 | 1 |
| 4) | 2 | 3 | 1 | 4 |

---

19) ख्रिश्चन धर्मप्रसाराला विरोध करण्याची भूमिका खालीलपैकी कोणत्या वृत्तपत्रांनी बजावली होती?

अ) प्रबोधय चंद्रोदय  ब) सद्धर्मदीपिका  क) प्रभाकर
ड) वर्तमानदीपिका  इ) उपदेश चंद्रिका

1) अ, इ  2) ब, क, ड  3) अ, ब, ड, इ  4) अ, ब, क, ड, इ

---

20) जगन्नाथ शंकरशेठ यांनी पुढीलपैकी कोणत्या कार्यात सहभाग/भूमिका बजावली होती?

अ) मुंबईतील मर्कंटाईल बँकेची स्थापना
ब) सतीप्रथा बंदी
क) जे.जे.स्कूल ऑफ आर्टची स्थापना
ड) बॉम्बे नेटीव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना
इ) भायखळा येथे राणीची बाग सुरू करणे.

1) अ, क, ड, इ  2) अ, क, ड  3) अ, ब, क, इ  4) अ, ब, क, ड, इ

---

21) 'आधुनिक मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक' म्हणून कोणाला ओळखले जाते?

1) भाऊ महाजन  2) रेव्हरंड टिळक  3) बाबा पद्मनजी  4) महात्मा फुले

---

22) टिळक भक्तांच्या गुप्त मंडळांसंबंधीची चुकीची जोडी ओळखा.

1) डॉ.सिद्धराम काणे – यवतमाळ
2) नरहर पंत घारपुरे – हैद्राबाद
3) गं.बा.देशपांडे – कोल्हापूर
4) डॉ.पु.वि.शिरगावकर – गोवा

---



DeccanIAS

23) खालीलपैकी कोणत्या संघर्षात गांधींनी 'जान किंवा जमीन' असा ठराव स्वतः मंजूर करून घेतला होता?
1) मुळशी सत्यागृह 2) दांडी मार्च 3) भोरचा सत्यागृह 4) वरील सर्व 1, 2 आणि 3

---

24) गणू मुदगे या कार्यकर्त्याने पुढील कोणत्या संघर्षात सक्रिय सहभाग नोंदवला होता?
1) बिळाशी 2) बागलाण 3) चणकापूर 4) वडाळा

---

25) – नियुक्तीसाठी स्पर्धा परीक्षा घेणे.
– नियुक्ती करण्याचा संचालकांचा अधिकार संपुष्टात आणणे.
– नियंत्रण मंडळ, त्याचा सचिव यांचे वेतन इंग्लंड सरकारने ठरवणे पण वेतन कंपनीने देणे.
वरील तरतुदी कोणत्या कायदयात करण्यात आल्या होत्या?
1) भारत सुशासन कायदा, 1858 2) चार्टर कायदा, 1853
3) चार्टर कायदा, 1813 4) भारतीय कौन्सिल कायदा, 1861

---

26) राजर्षी शाहू आणि बाबासाहेब आंबेडकरांचा घनिष्ठ संबंध कोणत्या प्रसंगापासून निर्माण झाला होता?
1) माणगाव परिषद (1920)
2) 'अखिल भारतीय बहिष्कृत सामाजिक परिषद' (1920)
3) मूकनायक वृत्तपत्राची सुरूवात
4) माँटफोर्ड सुधारणांना विरोध करण्याची कृती

---

27) महात्मा गांधींच्या आयुष्यातील घडामोडी कालानुक्रमे जुळवा.
अ) 'प्रत्येक बिटीश नागरिकास' हे प्रसिध्द निवेदन जाहीर केले.
ब) मिठाचा कायदेभंग
क) साबरमती आश्रम बंद केला.
ड) गांधी काँग्रेस मधून बाहेर पडले.
1) ब–क–ड–अ 2)ब–ड–क–अ 3) ब–अ–क–ड 4) ड–अ–ब–क

---

28) 'रंगराव', 'पालखीचा गोंडा' या संहितांचे लेखन कोणी केले आहे?
1) डॉ. रखमाबाई राऊत 2) ताराबाई शिंदे 3) काशीबाई कानिटकर 4) लक्ष्मीबाई टिळक

---

29) पुढे दिलेल्या विधानांपैकी अयोग्य विधाने निवडा.
अ) महाराष्ट्रात भारताच्या चुनखडीच्या 9% साठा व 2% उत्पादन होते.
ब) महाराष्ट्रात प्रामुख्याने धारवाड खडक प्रणालीत चुनखडीचे साठे आढळतात.
1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---

30) महाराष्ट्रात सर्वात कमी (30 दिवस) वार्षिक पावसाच्या दिवसांची नोंद झालेली ठिकाणे कोणती?

अ) म्हसवड  ब) जेजूरी  क) चिखलदरा

1) फक्त अ  2) अ, क  3) ब, क  4) अ, ब

---

31) जोड्या जुळवा.

| नदी | काठावरील शहर |
|---|---|
| अ) पेण (रायगड) | 1) कऱ्हा नदी |
| ब) चिपळूण | 2) वशिष्ठ नदी |
| क) जेजूरी | 3) भोगवती नदी |
| ड) कणकवली | 4) गड नदी |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 1 | 2 | 4 |
| 2) | 3 | 2 | 1 | 4 |
| 3) | 2 | 3 | 1 | 4 |
| 4) | 4 | 3 | 1 | 2 |

---

32) कोकण किनारपट्टीची सरासरी लांबी 720 कि.मी. आहे. या किनारपट्टीची सरासरी रुंदी किती?

1) 80 कि.मी.  2) 50-150 कि.मी.  3) 30-60 कि.मी.  4) 20-30 कि.मी.

---

33) महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणत्या जिल्ह्याची सीमा चहुबाजूंनी जालना, बुलढाणा, हिंगोली, नांदेड व लातूर आणि बीड यांना लागून आहे?

1) उस्मानाबाद  2) परभणी  3) औरंगाबाद  4) वाशिम

---

34) सह्याद्री पर्वतापासून 180 उत्तर अक्षवृत्तापासून आग्नेय दिशेने जात रायरेश्वरापासून शिंगणापूर पर्यंत पसरलेलली डोंगररांग कोणती ते ओळखा.

1) हरिश्चंद्र - बालाघाट  2) सातमाळ - अजिंठा

3) शंभू महादेव डोंगररांग  4) गाविलगड टेकड्या

---

35) अयोग्य जोडी ओळखा.

अ) सासवड पठार - पुणे

ब) औंध पठार - सातारा

क) पाचगणी पठार - पुणे

ड) खानापूर पठार - सांगली

1) फक्त ब  2) फक्त क  3) क, ड  4) वरीलपैकी एकही नाही

---



DeccanIAS

36) मांजरा नदीप्रणालीसंबंधी योग्य विधाने निवडा.

अ) बीड जिल्ह्यात पाटोदा पठाराच्या दक्षिणेकडील आंबेजोगाईच्या दक्षिणेस ही नदी वाहते.

ब) बीड जिल्ह्याची उत्तर सरहद्द मांजरा नदीमुळे तयार झाली आहे.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ आणि ब 4) दोन्ही नाही

---

37) खेड तालुक्यातील भिमाशंकर अभयारण्य ........ या प्राण्यासाठी प्रसिद्ध आहे.

1) शेकरू 2) काळवीट 3) गवा 4) कोतवाल

---

38) सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील कोणता जिल्हा सर्वात कमी लोकसंख्येचा (10 लाखापेक्षा कमी) आहे ?

1) गडचिरोली 2) सिंधुदुर्ग 3) नंदूरबार 4) गोंदिया

---

39) महाराष्ट्रातील 'अति पर्जन्याच्या जांभ्या विरहित विभागात' (कृषी हवामान विभाग) कोणता जिल्हा येतो ?

1) गडचिरोली 2) पालघर 3) रत्नागिरी 4) कोल्हापूर

---

40) सोलापूर जिल्ह्यात .......... नदीवर उजनी धरण आहे.

1) कृष्णा 2) भीमा 3) सीना 4) इंद्रायणी

---

41) ............ पिकाचे उत्पादन घेणारे महाराष्ट्र हे देशातील सर्वात अग्रेसर राज्य आहे.

1) तूरडाळ 2) कापूस 3) भुईमूग 4)बाजरी

---

42) मुंबई ते मंगलोर या मार्गाने धावणाऱ्या कोकण रेल्वे मार्गावर एकूण 73 बोगदे आहेत यापैकी सर्वात लांब बोगदा कोणता ?

1) कुरबुडे 2) सावर्डे 3) नाधवडे 4) निरवडे

---

43) योग्य जोड्या ओळखा.

| **ठिकाण** | | **वैशिष्ट्य** |
|---|---|---|
| अ) कुंथलगिरी | – | जैन धर्मीयांचे तीर्थस्थान |
| ब) पैठण | – | संत एकनाथांची समाधी |
| क) पुणतांबे | – | चांगदेव समाधी |

1) फक्त अ 2) अ, ब 3) फक्त ब 4) अ, ब, क

---



DeccanIAS

44) GST संदर्भातील सर्व महत्त्वपूर्ण बाबी ऑनलाईन हाताळण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'GSTN' या यंत्रणेच्या संदर्भात खालीलपैकी काय बरोबर आहे?

1) ही एक शासकीय मालकीची संस्था असून यात मोठ्या प्रमाणावर खाजगी क्षेत्राचेही मालकी हक्क आहेत.
2) GSTN च्या मूळ तांत्रिक बाबी हाताळण्याची जबाबदारी इन्फोसिस आणि टेक महिंद्रा या कंपन्यांना देण्यात आली आहे.
3) GSTN ला GST संदर्भातील कोणत्याही कायद्यामध्ये कोणत्याही नावाने उल्लेखले गेलेले नसून ही कार्यकारी अधिसूचनेद्वारे (executive notification) स्थापित एक संस्था आहे.
4) वरील सर्व

---

45) महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगांचा प्रादेशिकदृष्ट्या संतुलित विकास होण्यासाठी 'पॅकेज स्कीम ऑफ इन्टेन्सिव्हस' (PSI) ही योजना राबवली जाते. ही योजना कधीपासून राबवली जाते आहे?

1) 1962 2) 1964 3) 1992 4) 2004

---

46) RBI च्या अग्रक्रमक्षेत्र कर्जपुरवठा (Priority Sector Lending) धोरणामध्ये 10% कर्जपुरवठा 'दुर्बल घटकां'ना करण्याची अट आहे. या 'दुर्बल घटकां'मध्ये कोणाचा समावेश होत नाही?

1) NRLM लाभार्थी 2) NULM लाभार्थी 3) अल्पसंख्यांक समुदाय 4) वयोवृद्ध व्यक्ती

---

47) योग्य जोड्या जुळवा.

| **निर्यात विकास केंद्र (Export Development Centre)** | **महत्त्वाची निर्यात** |
|---|---|
| अ) जालंधर | 1) लेदरची पादत्राणे |
| ब) आग्रा | 2) ब्रासवेअर |
| क) अंबाला | 3) खेळ साहित्य |
| ड) मोरादाबाद | 4) शास्त्रीय उपकरणे |

**पर्याय :–**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 4 | 1 | 2 | 3 |
| 3) | 3 | 1 | 4 | 2 |
| 4) | 2 | 4 | 1 | 3 |

---

48) RBI कडे उपलब्ध असलेल्या मौद्रिक धोरणाच्या साधनांपैकी (Instruments of monetary) कोणती साधने भारतातच वापरली जातात?

अ) राखीव रोख गुणोत्तर (CRR) ब) वैधानिक तरलता गुणोत्तर (SLR)
क) तरलता समायोजन सुविधा (LAF) ड) बाजार स्थिरीकरण योजना (MSS)

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त ब, ड 4) फक्त अ, ड

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS

49) भारतात नियोजन आयोगाकडून दारिद्र्यरेषा ही खालीलपैकी कशाच्या स्वरुपात ठरवली जाते?
1) कॅलरीज
2) एकूण मासिक उत्पन्न
3) एकूण मासिक खर्च
4) यांपैकी नाही

50) भारतीय नियोजन प्रक्रियेमध्ये खालीलपैकी कोणत्या क्षेत्रामध्ये सर्वात प्रथम 'सूचक नियोजन' (indicative planning) पद्धतीचा उपयोग करण्यात आला?
1) कृषी आणि सहकार
2) ऊर्जा
3) विज्ञान आणि तंत्रज्ञान
4) शिक्षण

51) 2018-19 साली भारताच्या वस्तुव्यापारतोला (Merchandise Trade Balance) चे GDP शी शेकडा प्रमाण ......... एवढे होते.
1) 5.4%
2) -5.4%
3) 6.8%
4) -6.8%

52) जनगणना 2011 नुसार, खालीलपैकी कोणता जिल्हा हा महाराष्ट्रातील सर्वात कमी साक्षरता असणाऱ्या पाच जिल्ह्यांपैकी नाही?
1) जालना
2) सिंधुदुर्ग
3) नंदुरबार
4) परभणी

53) भाववाढ होत असताना कर संकलन (Collection of taxes) हे-
1) वाढते.
2) कमी होते.
3) ते शासनाच्या धोरणांवर अवलंबून असल्याने वाढतही नाही आणि कमीही होत नाही.
4) अप्रत्यक्ष करांच्या (indirect taxes) संदर्भात वाढते, मात्र प्रत्यक्ष करांच्या (direct taxes) संदर्भात कमी होते.

54) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या 'कर्ज-आधारित अनुदान' (Credit Linked Subsidy) या उपक्रमामध्ये ...... दराने ...... वर्षांसाठी 6 लाख रुपयांचे कर्ज दिले जाते.
1) 3.5% ;10
2) 6.5% ;15
3) 7.5% ;20
1) 5.5% ;18

55) दारिद्र्यनिर्मूलनाकरिता खालीलपैकी कोणती योजना 2 ऑक्टोबर या दिवशी सुरू करण्यात आली होती?
1) जवाहर रोजगार योजना
2) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (NREP)
3) ग्रामीण गैरभूधारक रोजगार हमी कार्यक्रम (Rural Landless Employment Guarantee Programme)
4) जवाहर ग्राम समृद्धी योजना



DeccanIAS

56) NSSO च्या 2011-12 सालच्या 68व्या फेरीतील पाहणीनुसार शहरी-ग्रामीण बेरोजगारीविषयक आकड्यांमध्ये खालीलपैकी कोणत्या प्रकारची बेरोजगारी ही ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा अधिक आढळली?

1) UPSS प्रकारची बेरोजगारी
2) CWS प्रकारची बेरोजगारी
3) CDS प्रकारची बेरोजगारी
4) वरील सर्व

---

57) बँकांमधील ठेवींना सुरक्षा प्रदान करणे तसेच बँकांद्वारे निर्माण होणाऱ्या पती (Credit) ची हमी देणे; या कार्यांसाठी ''ठेव विमा व पतहमी महामंडळ'' (Deposit Insurance & Credit Guarantee Corporation) हे कोणत्या वर्षी अस्तित्वात आले?

1) 1962
2) 1971
3) 1975
4) 1978

---

58) 'अल्कायर फॉस्टर पद्धती' (Alkire-Foster Method) ही खालीलपैकी कशाशी संबंधित आहे?

1) दारिद्र्य आणि कल्याण (Poverty of wellbeing) यांचे मोजमाप
2) बेरोजगारी मोजमाप
3) एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेला प्रदूषणामुळे झालेल्या हानीचे मोजमाप
4) एखाद्या अर्थव्यवस्थेस मिळणाऱ्या जनसांख्यिकीय लाभांशाचे (Demographic Dividend) पैशातील मूल्य काढणे.

---

59) ऑक्टोबर 2019 मध्ये ....... या विद्यापीठाने पार्श्वगायिका आशा भोसले यांना मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले.

1) हार्वर्ड विद्यापीठ (Harvard University)
2) कोलंबिया विद्यापीठ
3) केंब्रिज विद्यापीठ
4) सॅलफोर्ड विद्यापीठ

---

60) भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) व भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) यांनी मच्छिमारांच्या सुरक्षिततेसाठी खालीलपैकी कोणते/ती उपकरण/प्रणाली निर्माण केले/ली?

1) सागर (SAGAR)
2) जेमिनि (GEMINI)
3) गरूड (GARUDA)
4) आकाश (AKASH)

---

61) 'आभासीचलन निधी' (Cryptocurrency Fund) स्थापन करून, आभासी चलनाच्या माध्यमातून देणगी स्विकारणारी संयुक्त राष्ट्रसंघाची (UNO) पहिली संस्था म्हणजेच -

1) संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP)
2) युनिसेफ (UNICEF)
3) युनेस्को (UNESCO)
4) जागतिक आरोग्य संघटना (WHO)

---



DeccanIAS

62) जून 2019 मध्ये ……. या देशाने माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना परकिय नागरिकांना देण्यात येणाऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने (ऑर्डर ऑफ द अॅझटेक ईगल) गौरविले.
1) स्पेन
2) मेक्सिको
3) ब्राझिल
4) आयर्लंड

---

63) 'अ प्राईम मिनिस्टर टू रिमेम्बर' (A Prime Minister to Remember) या पुस्तकाचे लेखक कोण आहेत?
1) अॅडमिरल सुशिल कुमार
2) अॅडमिरल सुनिल लांबा
3) अॅडमिरल अरूण प्रकाश
4) अॅडमिरल देवेंद्र कुमार जोशी

---

64) 2020 च्या आय.पी.एल. टी-20 क्रिकेट स्पर्धेच्या खेळाडूंच्या लिलावात खालीलपैकी कोणता खेळाडू आजवरचा सर्वात महागडा विदेशी खेळाडू ठरला?
1) बेन स्टोक्स
2) ग्लेन मॅक्सवेल
3) पॅट कमिन्स
4) क्रिस मॉरिस

---

65) 'राजीव गांधी खेलरत्न पुरस्कारा' बाबत कोणती विधाने योग्य आहेत?
अ) 1991-92 पासून हा पुरस्कार देण्यास सुरूवात झाली.
ब) पहिला पुरस्कार बुद्धिबळ खेळाडूस (Chess Player) देण्यात आला.
क) 2019 चा पुरस्कार बजरंग पुनिया व मिराबाई चानू यांना देण्यात आला.
ड) आतापर्यंत केवळ दोनच दिव्यांग खेळाडूंना हा पुरस्कार देण्यात आला.
1) अ, क, ड
2) ब, क, ड
3) अ, ब, ड
4) अ, ब, क

---

66) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
1) 1998 मध्ये 'राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार' (NSA) हे पद निर्माण करण्यात आले.
2) 'जे.एम. दिक्षित' हे भारताचे पहिले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार होते.
3) 'अजित डोवाल' यांची सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी निवड करण्यात आली.
4) ऑक्टोबर 2019 मध्ये दत्तात्रय पडसलगीकर यांची 'राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागारपदी' नियुक्ती करण्यात आली.

---

67) खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
अ) ऑक्टोबर 2019 मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत राज्यात पहिल्यांदाच प्रायोगिक तत्त्वावर 'क्यूआर कोड' द्वारे मतदारांची पडताळणी करण्यात आली.
ब) 'क्यूआर कोड'च्या वापरामुळे मतदारांना कोणत्याही कागदपत्रांशिवाय मतदानाची संधी मिळते.
क) महाराष्ट्रात केवळ तीनच विधानसभा मतदारसंघात हा प्रयोग राबविण्यात आला.
ड) 'पुणे, ठाणे व नागपूर' जिल्ह्यातील प्रत्येकी एक विधानसभा मतदारसंघात 'क्यूआर कोड'द्वारे मतदान पार पडले.
1) फक्त ब
2) फक्त क
3) फक्त ड
4) क आणि ड

---

68) K-4 या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची मारक क्षमता (Range) किती आहे?

1) 750 कि.मी. 2) 1500 ते 2000 कि.मी.
3) 3500 कि.मी. 4) 1500 कि.मी.

---

69) 17 व्या लोकसभेतील सर्वात तरूण खासदार होण्याचा मान मिळालेल्या 'चंद्राणी मुर्मू' कोणत्या राज्यातून लोकसभेवर निवडून गेल्या?

1) झारखंड 2) ओडिशा
3) आंध्रप्रदेश 4) पश्चिम बंगाल

---

70) 15 ऑगस्ट 2019 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात भारताच्या कोणत्या शेजारी देशास 100 व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या?

1) म्यानमार 2) नेपाळ
3) अफगाणिस्तान 4) मालदिव

---

71) योग्य विधाने ओळखा.

अ) भारतात एकूण 38 जागतिक वारसास्थळे (World Heritage Sites) आहेत.
ब) जगात सर्वाधिक जागतिक वारसास्थळे 'फ्रान्स' मध्ये आहेत.
क) भारतात सर्वाधिक जागतिक वारसास्थळे महाराष्ट्रात आहेत.
ड) जयपूर हे भारतातील 38 वे 'जागतिक वारसा स्थळ' ठरले.

1) ब, क, ड 2) अ, क, ड 3) अ, ब, ड 4) अ आणि ड

---

72) पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे.

अ) देशव्यापी '5G' सेवा सुरू करणारा 'जपान' हा जगातील पहिला देश ठरला.
ब) 4G सेवेच्या तुलनेत 5G सेवेचा वेग 20 पट अधिक वेगवान आहे.
क) भारतात अद्याप 5G सेवेची सुरूवात करण्यात आलेली नाही.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) कोणतेही नाही

---

73) '$F \alpha \frac{m_1 m_2}{d^2}$' असे गुरूत्वाकर्षणाशी संबंधीत सूत्र कोणत्या नियमाने मांडले?

1) न्यूटनचा दुसरा नियम 2) न्यूटनचा गुरूत्वाकर्षणाचा वैश्विक नियम
3) आर्कीमीडीजचा नियम 4) वायूसंबंधी वैश्विक नियम

---

74) पुढे रंगाच्या काही जोड्या दिल्या आहेत त्यापैकी कोणत्या जोड्या पूरक रंगाच्या (Complimentary Colour) आहेत?

अ) निळा + पिवळा ब) लाल + मोरपंखी क) लाल + हिरवा ड) निळा + हिरवा

1) ब, क 2) अ, क 3) क, ड 4) अ, ब

---

75) अयोग्य जोडी ओळखा.

| गट | | वर्णन |
|---|---|---|
| अ) थॅलोफायटा | – | वनास्पती जगातील उभयचर |
| ब) ब्रायोफायटा | – | प्रामुख्याने पाण्यात वाढ होते |
| क) टेरीडोफायटा | – | फूल न येणारे वनस्पती |

1) फक्त अ 2) अ, ब 3) फक्त क 4) वरीलपैकी एकही नाही

76) अन्नाद्वारे विषबाधा (Food Poisoning) होण्यासाठी प्रामुख्याने कोणत्या जीवाणूच्या जाती कारणीभूत असतात?

1) क्लोस्ट्रेडियम 2) पेनीसीलीयम 3) लॅक्टोबॅसीली 4) मायकोबॅक्टेरियम

77) एका ध्वनी लहरीची तरंगलांबी 2cm इतकी आहे व ध्वनीचा हवेतील वेग 340m/s इतका आहे तर वारंवारता किती असेल?

1) 1700000Hz 2) 170Hz 3) 17000Hz 4) 1280Hz

78) पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधाने ओळखा.

अ) $\alpha$ कणांची भेदन क्षमता $\beta$ पेक्षा जास्त आहे.

ब) $\gamma$ कणांची आयनीभवन क्षमता सर्वात कमी आहे.

क) $\gamma$ कणांना वजन नाही.

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) अ, ब, क

79) पुढीलपैकी कोणते संप्रेरक हे यकृताला त्याच्याकडे साठवलेल्या ग्लायकोजनचे रूपांतर ग्लुकोजमध्ये करण्यास भाग पाडते?

1) ग्लुकॅगॉन 2) इन्सुलीन 3) सोमॅटोस्टटीन 4) कॅल्सीटोनिन

80) योग्य जोडी ओळखा.

| ऊती | | अवयव |
|---|---|---|
| अ) रोमक स्तंभीय अभिस्तर ऊती (Ciliated Columnar Epithelial Tissue) | – | श्वसनमार्ग |
| ब) घनाभरूप अभिस्तर (Cubodial Epithelium) | – | लाळग्रंथी |

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) अ आणि ब दोन्ही नाही

81) पुढीलपैकी कोणत्या लहरींची तरंगलांबी सर्वाधिक असेल?

1) मायक्रोवेव्ह 2) एक्स–रे 3) गॅमा–रे 4) रेडीओ लहरी

82) गव्हावरील बुरशीजन्य रोग कोणता?

1) आरगट 2) विल्ट 3) लिफस्पॉट 4) तांबेरा

---

83) विमानाच्या टायरमध्ये हवा भरण्यासाठी आणि क्रायोजेनिक्से (कमी तापमान भौतिकी) मध्ये पुढीलपैकी कोणता वायू वापरला जातो?

1) निऑन 2) आरगॉन 3) रेडॉन 4) हेलियम

---

84) आधुनिक आवर्तसारणीत कोणत्या खंडात युरेनियम व थोरियम ही मुलद्रव्ये आहेत?

1) s 2) p 3) d 4) f

---

85) जेव्हा एखादी वस्तू द्रायूमध्ये (Liquid) पूर्णपणे किंवा अंशतः बुडविली जाते तेव्हा तीने विस्थापीत केलेल्या द्रायूच्या ........ बल वरच्या दिशेने प्रयुक्त होत.

1) वजनाच्या दुप्पट 2) वजनाच्या निम्मे 3) वजनाइतके 4) वजनापेक्षा कमी


---

86) आंतरराष्ट्रीय एकक प्रणालीनुसार तापमानाचे SI एकक कोणते?

1) डिग्री सेल्सीअस 2) केल्विन 3) फॅरेनहाईट 4) क्यूरी87.

---

87) खालील आकृतीचा अभ्यास करा.




जर Y मध्ये असणाऱ्या घटकाच्या दुप्पट घटक हे X मध्ये असतील तर A ची किंमत दर्शविणारा पर्याय निवडा.

1) 128 2) 93 3) 94 4) 78

---

88. 200 ते 400 पर्यंतच्या क्रमगत संख्यांची सरासरी ही 50 ते 100 पर्यंतच्या क्रमगत संख्यांच्या सरासरीपेक्षा कितीने जास्त आहे?

1) 175 2) 200 3) 225 4) 300

---

89. एका इंटरनॅशनल स्कूलमधील, 200 विद्यार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला, त्यापैकी 80 विद्यार्थी हे पूमा किंवा आदिदास या कंपन्याचे बूट वापरत नाही. 60 विद्यार्थी हे फक्त आदिदास कंपनीचे बूट वापरतात. जेवढे विद्यार्थी वरील दोन्ही कंपन्यांचे बूट वापरतात त्याच्या तिप्पट विद्यार्थी फक्त पूमा कंपनीचे बूट वापरतात. तर 200 विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी दोन्ही कंपन्यांचे बूट वापरतात?

1) 20 2) 15 3) 40 4) 30

---

90. हंबीररावांचे वय हे गणेशच्या वयाच्या दुप्पट आहे 7 वर्षानंतर हंबीररावांचे वय हे रमेशच्या त्यावेळीच्या वयाच्या तिप्पट होईल. जर सध्या गणेश व रमेश यांच्या वयामध्ये 11 वर्षाचा फरक आहे तर हंबीररावांचे आजचे वय किती?

1) 48 2) 42 3) 36 4) 38

---

91. एक खेळाडू एका वर्तुळाकार मैदानावर धावण्याचा सराव करत आहे. मैदानाच्या सिमेवरून तो 7 फेऱ्या मारतो त्यावेळी 2200 मीटर अंतर कापतो. जर त्या मैदानाच्या केंद्रबिंदूपासून तो मैदानाच्या सिमेपर्यंत धावला तर तो एकुण किती अंतर कापेल?

1) 30 m 2) 156 m 3) 50 m 4) सांगता येत नाही

---

92. $\Delta ABC$ मध्ये $\angle BAC$ हा $\angle BCA$ च्या 4पट आहे. आणि बाजू AB व बाजू AC या सारख्या लांबीच्या आहेत तर $\angle ABC$ चे किती मापाचा आहे?

1) $60^0$ 2) $40^0$ 3) $30^0$ 4) $120^0$

---

93. खालील शृंखलेमध्ये एक संख्या चुकीची आहे. दिलेल्या पर्यायांमधून चुकीची संख्या दर्शविणारा योग्य पर्याय निवडा.

892,444,220,108,52,24,12,3

1) 3 2) 444 3) 12 4) 52


---




DeccanIAS


94. खाली दिलेल्या आकृतीमध्ये प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता पर्याय येईल?


**प्रश्नाकृती :–**




**पर्याय :–**

(1)


(2)


(3)


(4)


---

95. एका विशिष्ट प्रकारच्या सांकेतिक भाषेमध्ये 'love bird nice' म्हणजे 619, 'parents love kids' म्हणजे 157, तर 'parents like birds' म्हणजे 952, असे लिहिले जाते तर 'nice' साठी लिहला जाणारा संकेत दर्शविणारा पर्याय निवडा.

1) 1 2) 9 3) 6 4) वरीलपैकी नाही

---

96. विमानाच्या इंजिन उत्पादकाने पूर्वीच्या मॉडेलमध्ये असलेल्या सुरक्षितता वैशिष्ट्यांचा अभाव दूर करून नवीन इंजिन मॉडेल विकसित केले. पूर्वीचे मॉडेल अद्याप तयार केले जात आहे. पहिल्या वर्षादरम्यान दोन्हीही विकल्या गेलेल्या मॉडेल मध्ये, पूर्वीचे मॉडेल नवीन मॉडेलपेक्षा जास्त प्रमाणात विकले गेले; त्यावरून इंजिन निर्मात्याने असा निष्कर्ष काढला की सुरक्षितता ही ग्राहकांचा प्राथमिक मुद्दा नाही.

पुढीलपैकी कोणते विधान (खरे असल्यास), निर्मात्याचा निष्कर्ष सर्वात गंभीरपणे कमकुवत करेल?

1) खाजगी विमान मालक आणि व्यावसायिक विमान कंपन्या, याच विमान इंजिन उत्पादकाकडून इंजिन खरेदी करतात.
2) आधीच्या मॉडेल्सच्या सुरक्षिततेबद्दल अधिक माहिती असल्याने बरेच ग्राहक नवीन इंजिन मॉडेल्सच्या तुलनेत पूर्वीच्या इंजिन मॉडेल्सला अधिक सुरक्षित मानतात.
3) नवीन इंजिन मॉडेल आणि पूर्वीच्या इंजिन मॉडेलच्या किंमतीत कोणताही विशेष फरक नव्हता.
4) ज्या विमानांमध्ये पूर्वीचे इंजिन मॉडेल वापरले जाऊ शकत होते, त्या सर्व विमानांमध्ये नवीन इंजिन मॉडेल वापरले जाऊ शकते.

97. दोन ट्रेनच्या वेगांचे गुणोत्तर 6:8 आहे. जर दोन्ही ट्रेनच्या वेगामधील फरक हा ताशी 25 कि.मी.आहे तर 975 किलोमीटरचे अंतर कापण्यासाठी दुसऱ्या ट्रेनला किती वेळ लागेल?

1) 13 तास 2) 9.75 तास 3) 9 तास 45 मिनिटे 4) 11 तास 15 मिनिटे

---

98. A व B हे दोन व्यक्ती वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करतात जर A चा पगार हा B च्या पगारापेक्षा 40% ने जास्त आहे तर B चा पगार हा A च्या पगारापेक्षा किती टक्क्यांनी कमी आहे?

1) 40% 2) 28.57% 3) 66.66% 4) वरीलपैकी एकही नाही

---

99. जर P ÷ Q म्हणजे P हा Q चा मुलगा आहे.

P × Q म्हणजे P ही Q ची पत्नी आहे.

तर 'x ÷ y × z' या राशीनुसार खालीलपैकी कोणते विधान बिनचूक आहे?

1) z च्या मुलीचे नाव 'x' आहे.

2) z हा x चा मुलगा आहे.

3) y हे x चे वडील आहेत.

4) वरीलपैकी एकही नाही

---

100. सहाजण मित्र सहलीला गेले आहेत. त्यांच्यापैकी चारजण हे जलतरणपटू आहेत, चारजण हे विज्ञानात Ph.D असणारे आहेत. तर एक जण अभियंता आहे आणि तिघेजण रेल्वेमध्ये नोकरी करत आहे. विपीन व काकासाहेब हे रेल्वे कर्मचारी आहे तर आण्णासाहेब व कुंदन कुठेही नोकरीला नाहीत. कुंदन व नितीन हे जलतरणपटू आहेत. काकासाहेब, आण्णासाहेब, कुंदन व नितीन हे विज्ञानात Ph.D. प्राप्त केलेले व्यक्ती आहेत आणि या चौघांपैकी दोघेजण रेल्वेत कर्मचारी आहेत. जर शाम हा अभियंता असेल तर, रेल्वेत काम करणारा जलतरणपटू असेलल्या व्यक्तीचा पर्याय निवडा.

1) शाम 2) कुंदन 3) आण्णासाहेब 4) नितीन

****

सूचना – ( पृष्ठ 1 वरून पुढे......)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम – 82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग–1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

## नमुना प्रश्न

प्र.क्र 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) राजा राममोहन रॉय'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तरक्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र.201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररित्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये पहावा.

### कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

DeccanIAS